**तातडीचे**

क्रमांक पोमसं /३९ /४२ /परिपत्रक/११/२०१९ मुंबई, दिनांक :- 11 /०९/२०१९

**विषय :-** परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदांना सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदान व लाभाबाबत.

******

**परिपत्रक -**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अंनियो-२०१७/प्र.क्र. २९/ सेवा-४, दि. २९/९/२०१८ अन्वये दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणाऱ्या कर्मचाऱ्यास १० वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असतांना मृत्यू पावल्यास, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या कायदेशिर वारसास सानुग्रह अनुदान रु. १० लक्ष अधिक कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली संचित रक्कम देण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.

२. उपरोक्त शासन निर्णयात सानुग्रह अनुदान मंजुर करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती, यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी या बाबी नमुद करण्यात आलेल्या आहेत. असे असतांनाही सदर प्रकरणी घटक कार्यालयाकडून मृत कर्मचाऱ्याच्या वारसदारास सानुग्रह अनुदान मंजुरीचे शासनास सादर करावयाचे प्रस्ताव शासन निर्णयातील तरतुदीनुसार सादर केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्या अनुषंगाने सर्व घटक प्रमुख/विभाग प्रमुखांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी खालील नमूद बाबींची पूर्ण पूर्तता करुनच आवश्यक असलेली मूळ कागदपत्रे व इतर कागदपत्रांवर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार सांक्षाकन करुन परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी या कार्यालयास पाठवावेत. खाली नमूद कागदपत्रांपैकी एकही कागदपत्र प्रस्तावासह प्राप्त न झाल्यास प्रस्ताव परत पाठविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१) नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसदाराचा अर्ज - परिषिष्ट १ (मुळ स्वाक्षरीची प्रत)
२) मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)
३) न्यायालयीन वारस प्रमाणपत्र (मुळ प्रत) (वारसदाराचे शपथपत्र जोडू नये.)
४) कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेतील नियुक्ती आदेशाची सांक्षाकित प्रत
५) शासकीय येणे बाकी नसल्याचा दाखला
६) डी. सी. पी. एस प्रमाणपत्र
७) बहुतांशी प्रस्तावासह प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रांवर / झेरॉक्स प्रतींवर स्वीय सहाय्यक यांची स्वाक्षरी असते, सदरील परिशिष्ठावर कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.
८) मृत कर्मचाऱ्याने नामनिर्देशन केले असल्यास नामनिर्देशन प्रमाणपत्रावरील दिनांक व मृत कर्मचाऱ्याची स्वाक्षरी मुळ स्वरुपात असावी, त्यात खाडाखोड नसावी.
९) सानुग्रह अनुदान मंजुरीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या मार्फतीने शासनास सादर करावयाचा असल्याने संपूर्ण प्रस्ताव दोन प्रतीत या कार्यालयास पाठवावा.

**( कृष्ण प्रकाश )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त [ लोहमार्गसह]

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे/ लोहमार्ग, मुंबई /रा.रा.पो.बल, मुंबई /वाहतूक, मुंबई/ प्रशिक्षण व खास पथकें

संचालक, बिनतारी संदेश विभाग म.रा.,पुणे/म.पो.अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, पुणे/ रा.रा.पो.बल, पुणे व नागपूर /वि.सु.वि., दादर /ना.ह.सं. महिला अत्याचार प्रतिबंध विभाग,पुणे /न.वि.अ., नागपूर.

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक [ जिल्हे /लोहमार्ग / बिनतारी संदेशसह ]

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र . १ ते १६

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. महाराष्ट्र राज्य मुंबई

२. सदरहु परिपत्रक www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर पुढील २ महिन्यासाठी ठेवण्यात यावे.